मजकुर :—

दिनांक २१/११/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या आदेशाने **" Best Detection of the Month "** माहे सप्टेंबर—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर —२०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | कक्ष—०५, गुप्रशा., गुअवि., मुंबई | **गु.प्र.शा.,गु.र.क्र. १३८/२०२२ ( शिवाजी पार्क पो.ठा. गु.र.क्र.६०१/२२ ) कलम ४५४, ४५७, ३८०, ४११, ३४ भादवि** |

### —: " घरफोडी करून चोरी ":—

गुन्हयाची थोडक्यात हकिकत :— नमुद गुन्हयात दि. २४/०८/२०२२ रोजी १४:०० वा. ते १७:०० वा. चे दरम्यान 'जी.बी. पेडणेकर ज्वेलर्स' आर.के. वैद्य रोड, दादर (प.), मुंबई या ठिकाणी कोणीतरी अज्ञात इसमाने फिर्यादी हे दुकान बंद करून घरी गेले असताना दुकानाच्या मागच्या बाजुचे लोखंडी ग्रील तोडून त्यामधून दुकानात प्रवेश करून, आतल्या लोखंडी शटरच्या दरवाजाचे लोखंडी कूलूप तोडून तसेच त्याचे आतमधील लाकडी दरवाजा उचकटून दुकानात प्रवेश करून एकुण अंदाजे वजन २४९२ ग्रॅम. किंमत १,२४,६०,०००/—रूपये किंमतीचे सोन्याचे दागीने घरफोडी चोरी करून नेले म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | सौ. सोनाली मिलींद मुतकेकर वय ४६ वर्षे |
| चोरीस गेलेली मालमत्ता | :— | १) अंदाजे वजन २४० ग्रॅमचे ८ नग मोठे नेकलेस<br>२) अंदाजे वजन २१० ग्रॅमचे १४ नग लहान नेकलेस<br>३) अंदाजे वजन ४४८ ग्रॅमचे ३२ नग गंठन<br>४) अंदाजे वजन ९६० ग्रॅम त्या मध्ये गंठन,ब्रेसलेट,चेन,माळा<br>५) अंदाजे वजन ५०४ ग्रॅम त्या मध्ये कानातील रिंगा व झुमके<br>६) अंदाजे वजन १३० ग्रॅम सुंकल्या,सोन्याच्या तारा,मणी,फासे, लॉकेट<br>**एकुण वजन २४९२ ग्रॅम सोने अंदाजे किंमत १,२४,६०,०००/— रूपये** |
| हस्तगत मालमत्ता | :— | १८९७ ग्रॅम वजनाचे सोन्याच्या एकुण ४ लगडी. कि.अ. ९४,९०,०००/ |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) विनोद रामबली सिंग, वय ५२ वर्षे<br>२) पारस छबीलदास जुबालीया वय ५०वर्षे<br>३) विनोद रामसुरत शाहनी वय ४६ वर्षे<br>अटक दि.०३/०९/२०२२ रोजी |

तपास कौशल्य :— सणासुदीच्या वेळेस दिवसाढवळया गजबजलेल्या अश्या दादर परिसरात ज्वेलर्सच्या दुकानात घरफोडी झाल्याने परिसरातील जनमानसात भितीचे व असुरक्षिततेचे वातावरण निर्माण झाले होते. त्यामुळे मा. वरि ठांनी सदर गुन्हयाची दखल घेवून गुन्हा प्राधान्याने उघडकीस आणणेकरीता योग्य त्या सुचना व मार्गदर्शन केले होते. त्याअनु ंगाने सदर गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून कक्ष ५ कार्यालयामार्फत तात्काळ ४ पथके तयार करण्यात आली. सदर पथकांमार्फत सर्वप्रथम गुन्हयाच्या घटनास्थळी भेट देवून पाहणी व चौकशी केली असता गुन्हयासंदर्भात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा प्रत्यक्ष घटनास्थळी कोणत्याही प्रकारचे सी.सी.टी.व्ही. कॅमेरे मिळून आले नाही.

घटनास्थळी मागील ग्रील तोडून चोरी झाल्यामुळे गुन्हेगार हा प्रचंड सराईत असल्याची खात्री झाल्याने घटनास्थळावर येणाऱ्या सर्व मार्गावरील खाजगी दुकाने, सोसायटी येथील सर्व सी. सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांचे दिनांक २४/०८/२०२२ रोजीचे संपूर्ण दिवस व रात्रीचे फुटेज प्राप्त करण्यात आले. गुन्हयाचे अनु ंगाने फिर्यादी यांचेकडे बारकाईने विचारपूस केली असता, फिर्यादींनी त्यांच्या दूकानात यापूर्वी एकूण ५ इसम नोकरीस होते व त्या सर्वांनी नोकरी सोडले असल्याचे सांगितले

तसेच फिर्यादी यांनी दोन इसमांच्या मदतीने त्यांच्या दूकानातील ए.सी. रिपेअरिंग चे काम केले असल्याचे सांगितले. तपासी पथकाने फिर्यादी यांचे दूकानात पूर्वी नोकरीस असलेले एकूण ५ इसमांचे तसेच फिर्यादी यांचे दूकानात २ महिन्यापुर्वी ए.सी. रिपेअरिंग चे काम करणाऱ्या इसमांचे मोबाईल सी.डी.आर. प्राप्त करून त्याआधारे त्यांना ताब्यात घेवून त्यांच्याकडे गुन्हा उघडकीस

आणण्याच्या दृष्टीने प्रयत्न केला असता काहीही उपयुक्त माहिती मिळून आली नाही. तसेच अश्या प्रकारचे गुन्हे करणारे अभिलेख वरील आरोपी व जेल रिलीज आरोपी यांची माहिती प्राप्त करून त्यांच्याकडे तपास केला परंतू काहीही माहिती मिळून आली नाही.

घटनास्थळ फुटेजची बारकाईने तपासणी केली असता घटनास्थळ हे दादर सारख्या गजबजलेल्या परिसरातील असल्याने सदर ठिकाणी अनेक व्यक्तींचा वावर असल्याचे दिसून आले. त्यामूळे नेमके संशयित इसम कोण याचा अंदाज लावणे कठीण झाले होते. त्यामुळे फिर्यादी यांचेकडे बारकाईने विचारपूस केली असता दुकानातील फिक्कट निळया रंगाचा हातरूमाल चोरीस गेल्याचे फिर्यादींनी सांगितले.

सदर माहिती प्राप्त केल्यानंतर प्राप्त केलेले फुटेजची परत एकदा बारकाईने तपासणी केली असता, घटनास्थळापासून साधारणतः १०० मिटर अंतरावर असलेल्या एका दूकानातील खाजगी सी.सी.टी.व्ही. कॅमेरामधून अस्पष्ट असे दोन संशयित इसम दिनांक २४/०८/२०२२ रोजी दुपारी १६.१५ वा च्या सुमारास जी.बी. पेडणेकर ज्वेलर्सच्या मागील बाजूस असलेल्या गल्लीतून बाहेर निघून जवळच असलेल्या सर्वोदय जनरल स्टोअरच्या दिशेने एका पाठोपाठ पायी चालत जाताना दिसून आले. सदरवेळी नमूद दोन इसमांपैकी एक इसम फिक्कट निळया रंगाचा हातरूमाल चेहऱ्यावर लावून त्याचा चेहरा लपवित असल्याचे दिसून आले. नमूद प्राप्त फुटेज फिर्यादींना दाखविले असता, त्यांनी नमूद इसमाच्या हातातील हातरूमाल हा त्यांच्या दूकानातून चोरी गेलेला हातरूमाल असल्याचे ओळखले. त्यावरून नमूद दोन्ही इसमांनी सदरचा गुन्हा केला असल्याचे प्राथमिकदृष्टया स्पष्ट झाले.

त्यानंतर तपासी पथकाने आरोपी पळून गेलेल्या मार्गातील घटनास्थळापासून ते चैत्यभूमी या दरम्यानचे एकूण ३९ खाजगी कॅमेऱ्यांचे फुटेज प्राप्त केले. प्राप्त फुटेजची तपासणी केली असता, चोरी करणारे दोन्ही संशयित इसम हे पोलीसांची दिशाभूल व्हावी व संशय येवू नये म्हणून पायी चालत चालत चैत्यभूमी पर्यत येवून तेथे एका टॅक्सीत बसून टॅक्सीतून शिवसेना भवनच्या दिशेने जाताना दिसून आले. त्यानंतर शिवसेना भवन ते वाकोला पोलीस ठाणे या दरम्यानचे एकूण ४७ खाजगी व सरकारी कॅमेऱ्यांचे फुटेजची तपासणी केली असता, चोरी करणारे संशयित इसम सदर टॅक्सीतून पश्चिम द्रुतगती मार्गावरून वाकोला पोलीस ठाणे पर्यत आल्यानंतर सदरठिकाणी टॅक्सीतून खाली उतरून थोडे अंतर पायी चालल्यानंतर एका रिक्षात बसून पश्चिम द्रुतगती मार्गावरून बोरीवलीच्या दिशेने जाताना दिसून आले. त्यानंतर पश्चिम द्रुतगती मार्गावरील एकूण ७३ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची तपासणी केली असता नमूद संशयित इसम दहिसर टोल नाक्याच्या अलीकडे रिक्षातून खाली उतरून पायी चालत मीरा रोडच्या दिशेने जाताना दिसून आले. अशाप्रकारे संशयित आरोपीत इसम पोलीसांची दिशाभूल करण्याकरीता वेगवेगळया मार्गाने वाहने बदलवून पळून जात असल्याचे निदर्शनास आले.

तसेच त्यानंतर मुख्य संशयित आरोपी ज्यामार्गाने घटनास्थळावर आला त्यामार्गावरील प्रत्येक ५० मिटर अंतरावरील एकूण २८ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची पाहणी केली असता, मुख्य संशयित आरोपी दादर रेल्वे स्थानकातून बाहेर पायी चालत येताना दिसून आला. सर्व प्लॅटफॉर्म वरील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची पाहणी केली असता, मुख्य संशयित आरोपी हा विरार ते चर्चगेट लोकल ट्रेन क्र. ५१०५ मधून दादर रेल्वे स्थानक येथे आल्याचे दिसून आले. नमूद नमूद लोकल ट्रेन क्र. ५१०५ मार्गावरील दादर रेल्वे स्थानकापुर्वीचे  येणारे एकूण १९ रेल्वे स्थानक परिसरातील प्लॅटफॉर्म वर लावण्यात आलेल्या सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची तपासणी केली असता, नमूद संशयित इसम नालासोपारा येथून लोकल ट्रेन मध्ये बसला असल्याचे दिसून आले.

नालासोपारा पुर्व व पश्चिम परिसरातील रेल्वे स्थानक लगतच्या परिसरातील प्रत्येक ५० मिटर अंतरावरील एकूण ७० ते ८० सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची तपासणी केली असता मुख्य संशयित आरोपी नालासोपारा पश्चिम परिसरातील हनूमान नगर परिसरातून बाहेर निघून नालासोपारा रेल्वे स्थानकाच्या दिशेने पायी चालत येत असल्याचे दिसून आले. तसेच आर.के.वैदय मार्गावरून आलेला दुसरा सहआरोपी गुन्हा करण्यापुर्वी ज्यामार्गाने घटनास्थळावर आला त्यामार्गावरील प्रत्येक ५० मिटर अंतरावरील एकूण २५ सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची पाहणी केली असता, संशयित आरोपी दादर रेल्वे स्थानकातून बाहेर पायी चालत येताना दिसून आला. त्यानंतर दादर रेल्वे स्थानक परिसरातील सर्व प्लॅटफॉर्म वरील सी.सी.टी.व्ही. कॅमेऱ्यांची पाहणी केली असता, नमूद संशयित

आरोपी हा विरार ते चर्चगेट लोकल ट्रेन क्र. ५०१७ मधून दादर रेल्वे स्थानक येथे भाईंदर येथून लोकल ट्रेनने असल्याचे दिसून आले.

तपासात नमूद दोन्ही संशयित आरोपी हे वेगवेगळया लोकल ट्रेन ने घटनास्थळी आल्याचे तपासात निष्पन्न झाले. त्यामुळे नालासोपारा रेल्वे स्थानक व नालासोपारा येथील हनूमान नगर परिसर अशा वेगवेगळया एकूण ७ ठिकाणांवरील मोबाईल टॉवर सेल आय डी प्राप्त करून तेथील डम डाटा काढून त्याची तपासणी केली असता, काही संशयित मोबाईल क्रमांक प्राप्त करण्यात आले.एकदंरित तपासात दोन्ही संशयित आरोपीतांचे अस्पस्ट छायाचित्र प्राप्त करण्यात आले. नमूद अस्पस्ट छायाचित्रांच्या आधारे संशयित आरोपीताचा शोध घेण्याकरीता नालासोपारा पश्चिम परिसरात व दुसऱ्या संशयित आरोपीताचा ाोध घेण्याकरीता भाईंदर पुर्व परिसरात नेमणूक करण्यात आली. संशयित आरोपीतांचे प्राप्त अस्पस्ट फोटो दाखवून पाहिजे आरोपीतांचा शोध घेतला.

तपासी पथकातील अधिकारी कर्मचारी हे दिनांक २८/०८/२०२२ रोजी पासून ते दिनांक ०२/११/२०२१ रोजी पर्यत वेशांतर करून नालासोपारा व भाईंदर परिसरात ठाण मांडून होते. संशयित आरोपीतांचा ाोध घेत असताना, मुख्य संशयित आरोपी दिनांक ०२/०९/२०२२ रोजी सायकांळच्या सुमारास, हनूमान नगर परिसर, नालासोपारा पश्चिम, पालघर याठिकाणावरून नालासोपारा रेल्वे स्थानकाच्या दिशेने संशयास्पद रित्या पायी चालत जात असताना दिसून आला. नमूद पोलीस पथकाने सदर इसमास त्याच्या चालण्याची लकब व पेहराव च्या आधारे संशयावरून ताब्यात घेवून त्याचेकडे चौकशी केली असता, त्याने सुरवातील नकार दिला. परंतू पथकाने नमूद संशयित इसमाकडे सतत दोन तास कौशल्यपूर्ण विचारपूस केली असता, त्याने गुन्हयाची कबूली देवून त्याचे नाव विनोद रामबली सिंग, वय ५२ वर्षे असे सांगितले. याचेकडे केलेल्या चौकशीवरून त्याने त्याचा सहकारी विनोद रामसुरत सहानी, वय ४६ वर्षे याचेसह सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली.

ताब्यात घेतलेला आरोपी विनोद सिंग याचेकडे अधिक चौकशी केली असता त्याने गुन्हयात चोरी केलेले दागिने वितळविणेकरीता भाईंदर परिसरातून इलेक्ट्रीक मशीन, कोळसा व इतर साहित्य खरेदी करून चोरी केलेले दागिने लागलीच वितळवून दागिन्यांच्या एकूण सोन्याच्या ४ लगडी बनवून त्यापैकी १ सोन्याची लगड त्यांचा सहकारी नामे पारस जोबालीया याचेकडे सुपूर्द करून त्यास अहमदाबाद, गुजरात येथे विक्री करण्याकरीता पाठविले असल्याचे सांगीतले.लागलीच अहमदाबाद येथे जावून पाहिजे आरोपी पारस जोबालीया याच्या प्राप्त सी.डी.आर. च्या आधारे त्याच्या संपर्कातील अहमदाबाद येथील स्थानिक कॉलर ला ताब्यात घेवून त्याचेकडे कौशल्यपूर्ण तपास करून त्याच्या मदतीने पारस जोबालीया यास अहमदाबाद, गुजरा येथून ताब्यात घेवून मुंबईत आणण्यात आले. त्यांच्याकडे एकत्रितरित्या चौकशी केली असता, त्यांचा सहकारी विनोद सहानी हा गुरगाव, दिल्ली येथे पळून जाण्याच्या तयारील असल्याची माहिती मिळाल्याने त्यास मुख्य आरोपीताच्या मदतीने फसवे कॉल करून त्यास भाईंदर परिसरात बोलावून ट्रॅप लावून त्यास ताब्यात घेण्यात आले. नमूद सर्व आरोपीतांकडे सखोल व एकत्रितरित्या तपास केला असता त्यांनी सदरचा गुन्हा केला असल्याची कबुली दिली.
आरोपीतांना नमूद गुन्हयात अटक करून पोलीस कोठडी दरम्यान नमूद आरोपीतांकडून खालील नमूद मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे.

१) ४९९.००० ग्रॅम वजनाची सोन्याची एक लगड
२) ४६७.९१० ग्रॅम वजनाची सोन्याची एक लगड
३) ४२८.३९० ग्रॅम वजनाची सोन्याची एक लगड
४) ५०२.७०० ग्रॅम वजनाची सोन्याची एक लगड
एकूण १८९८ ग्रॅम वजनाच्या सोन्याच्या एकूण ४ लगडी

सदरचा गुन्हा हा सणासुदीच्या वेळेस दिवसाढवळया गजबजलेल्या अश्या दादर परिसरात गणपती सणाच्या मुहर्तावर झाला होता. तसेच नमूद गुन्हयातील घटनास्थळी प्रत्यक्षदर्शी साक्षीदार किंवा सी.सी.टी.व्ही. फुटेज याबाबत काहीएक सुगावा नसताना सदर गुन्हयाची उकल करणे अतिशय क्लिस्ट होते. सदर गुन्हयाचा तपास गुन्हे शाखा कक्ष ०५, कार्यालयाच्या पोलीस पथकास यश मिळाले आहे. त्यामुळे जनमानसात पोलीस दलाची प्रतीमा सुधारण्यामध्ये तपासी पथकातील अधिकारी कर्मचारी यांनी मोलाची कामगिरी बजावलेली आहे.

## गु.प्र.शा. गु.अ.वि, कक्ष—०५, गुन्हे शाखा, तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | प्रभारी पोलीस निरीक्षक | घनश्याम सत्यदास नायर, | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | पोलीस निरीक्षक | सदानंद किशनराव येरेकर, | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | पोलीस निरीक्षक | सुनिता अभिजीत भोर | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | अजित महादेव गोंधळी, | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | सहा. पोलीस निरीक्षक | अमोल माधव माळी | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | सहा. पोलीस निरीक्षक | जयदीप मोहन जाधव | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | सहा. पोलीस निरीक्षक | संजय रामदीप यादव, | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | स.पो.उ.नि.क्र.२७९८३ | सुधाकर नामदेव साळूंखे, | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | स.फौ. क्र. २८२२७ | अंकुश बाबालाल न्यायनिर्गुणे, | प्रशस्तीपत्रक |
| १० | स.फौ.क्र.११०३४ | अशोक पांडुरंग भुजबळ, | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ह.क्र.२९७९९ | रविंद्र महिपत राणे, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ह.क्र. ३१२३४ | धनंजय आनंद पैंगणकर, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ह.क्र. ३१२४९ | विलास देविदास देसाई | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ह.क्र. ३१३१८ | सुजीत भागवत घाडगे, | प्रशस्तीपत्रक |
| १५ | पो.ह.क्र. ३३८२७ | मिलींद दिनकर निरभवणे, | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.ह.क्र. ९६०५३६ | नितेश नारायण विचारे, | प्रशस्तीपत्रक |
| १७ | म.पो.ह.क्र.९८०५४४ | सुनिता संजय शिंदे, | प्रशस्तीपत्रक |
| १८ | पो.ह.क्र. ९९००३३ | संजय देवजी वायंगणकर, | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.क्र. ०१—५८ | अविनाश शंकर चिलप, | प्रशस्तीपत्रक |
| २० | पो.ना.क्र. ३३४०९/ | इक्बाल संतोष सिंग, | प्रशस्तीपत्रक |
| २१ | पो.ना.क्र. ०३२०४/ | तानाजी शंकर पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| २२ | पो.ना.क्र. ०३—७३८ | सुनिल सुर्यकांत जाधव, | प्रशस्तीपत्रक |
| २३ | मपोनाक्र. ०६०९६८ | दर्शना समीर काकीर्डे, | प्रशस्तीपत्रक |
| २४ | पो.शि.क्र.०८०२१६ | रावसाहेब पांडूरंग फुंदे, | प्रशस्तीपत्रक |
| २५ | पो.शि.क्र.०८०३६२ | गणेश रघुनाथ काळे, | प्रशस्तीपत्रक |
| २६ | पो.शि.क्र. ०८०६८६ | सरफरोज सलिम मुलाणी, | प्रशस्तीपत्रक |
| २७ | म.पो.शि.क्र. ०९११३९ | शुभांगी ज्योतेष पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| २८ | मपोशिक्र. ०९१३२९ | भावना जयवंत पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| २९ | मपोशिक्र. ०९१४०१ | सुप्रीया सुभाष पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ३० | पो.शि.क्र.०९०२८४, | युवराज श्रीपती सावंत | प्रशस्तीपत्रक |
| ३१ | पो.शि.क्र. १५१११३ | प्रमोद धोंडीराम पाटील, | प्रशस्तीपत्रक |
| ३२ | स.फौ.चा.क्र.२८६१५ | शशीकांत उत्तम घोरपडे, | प्रशस्तीपत्रक |
| ३३ | पो.ह.चा.क्र.९६१७६८ | सलीम हसन मुलाणी, | प्रशस्तीपत्रक |
| ३४ | पो.ना.चा.क्र.९९०६०७ | हरेश लक्ष्मण कांबळे | प्रशस्तीपत्रक |

## (अ) बेस्ट डिटेक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर —२०२२

| | | |
|---|---|---|
| ०२ | अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट गु.प.शा., गु.अ.वि., मुंबई | गु.र.क्र. २५/२०२२ कलम ८(क) सह २२(क), २९ एनडीपीएस कायदा, १९८५ |

—: " **एम.डी. या अंमली पदार्थाचे उत्पादन करून विक्री** ":—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात अंमली पदार्थ खरेदी, विक्री करणाऱ्याविरूध्द कायदेशीर कारवाई करण्याचे वरिष्ठांच्या आदेशान्वये दिनांक २९/०३/२०२२ रोजी गस्तीदरम्यान आरोपी शमशुल्लाह ओबाईदुल्लाह खान, वय ३८ वर्षे याने २५० ग्रॅम एम.डी. हा अंमली पदार्थ स्वत:च्या कब्जात बाळगला असताना मिळून आला.

सदर अंमली पदार्थ जप्त करण्यात आला. त्याचेकडे जागीच नमूद अंमली पदार्थ कोणाकडुन खरेदी केला याबाबत कसून चौकशी केली असता त्याने आयुब इजहार अहमद शेख, वय ३३ वर्षे याचे घर दाखविल्याने पोलीस पथक पंचांसह आरोपीच्या घरी जावून घराची तपासणी केली असता त्याचे घरामध्ये २ किलो ७६० ग्रॅम 'एम.डी.' हा अंमली पदार्थ मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला. दोन्ही आरोपीतांनी एकूण ३ किलो १० ग्रॅम एम.डी. किं.रु. ४,५१,५०,०००/— हा अंमली पदार्थ संगनमताने वाहतुक व विक्री करीता स्वत:चे कब्जात बेकायदेशीररित्या बाळगला म्हणून त्यांचेविरूध्द नमूद प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. प्रितम पुरुषोत्तम ढोरे (पो.ना.क्र. ०३.१४१०) |
| हस्तगत मालमत्ता | :— | रूपये ४८५६ कोटी ४१ लाख ४ हजार किंमतीचा व एकुण २४२८ किलो ९५८ ग्रॅम वजनाचा ''एम.डी. (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ |
| आरोपी अटक व दिनांक | :— | १) शमशुल्लाह ओबाईदुल्लाह खान,वय ३८ वर्ष<br>२) आयुब इजहार अहमद शेख, वय ३३ वर्ष<br>३) रेश्मा संजयकुमार चंदन, वय ३८ वर्ष<br>४) रियाज अब्दुल सत्तार मेमन, वय ४३ वर्ष<br>५) प्रेमप्रकाश पारसनाथ सिंग, वय ५२ वर्ष<br>६) किरण रामकृष्ण चौधरी, वय ५२ वर्ष<br>७) रामेंद्रकुमार गिरीराजकिशोर दिक्षीत, वय ५० वर्ष<br>८) जिनेंद्र व्होरा वय ३८ वर्ष<br>अटक दि. २९/०३/२२ ते दि. ०९/०९/२२ रोजी चे दरम्यान |

**तपास कौशल्य** :— गुन्हयाच्या पुढील तपासामध्ये, अटक आरोपी क्र. १ व २ यांचे तपासादरम्यान त्यांनी, त्यांच्याकडे मिळून आलेल्या एम.डी. हा अंमली पदार्थ त्यांना कोणी पुरविला याबाबत कोणीतीही माहिति दिलेली नव्हती. त्यामुळे त्यांना अंमली पदार्थाचा पुरवठा करणाऱ्या इसमांचा शोध घेण्याचे कठीण आव्हान होते. परंतु, नमुद आरोपीतांच्या मोबाईल क्रमांकांचे सी.डी.आर. व एस.डी. आर. तसेच बॅक खाती यांची विवरण प्राप्त करण्यात आली. सदर प्राप्त विवरण पत्रांचा अत्यंत बारकाईने अवलोकन व विश्लेषण केले असता एम.डी. हा अंमली पदार्थाची पुरवठादार असलेली महिला रेश्मा संजयकुमार चंदन, वय ४९ वर्षे हिचेबाबत माहिती प्राप्त झाली. परंतु, ती तीचे राहते ठिकाण सतत बदलत असल्याने तिचा निच्छित ठावठिकाणा मिळून येत नव्हता. तरीही, अत्यंत कौशल्याने परिश्रमपूर्वक तांत्रिक तपास करून तीचा ठावठिकाणाबाबत माहिती प्राप्त करून तीला नमूद गुन्हयात दिनांक २७/०७/२०२२ रोजी अटक करण्यात आली होती.

त्यानंतर, कोठडी दरम्यान केलेल्या केलेल्या तपासात अटक आरोपी आयुब इजहार अहमद शेख, वय ३३ वर्षे याचेकडुन जप्त केलेला 'एम.डी.' हा अंमली पदार्थ रियाज भाई नावाच्या इसमाकडुन खरेदी करून आयुब शेख, याला दिल्यानंतर सदर अंमली पदार्थाची रक्कम आयुब शेख हा तिच्या बॅक खात्यात ट्रान्सफर करीत असे. त्यानंतर या रक्कमेपैकी नमुद महिला आरोपी तिचा हिस्सा काढुन घेवुन उर्वरीत रक्कम रियाज याला चेकने किंवा कॅशने देत असे. नमूद महिला आरोपीने दिलेल्या माहितीवरून सापळा लावून अटक आरोपी रियाज अब्दुल सत्तार मेमन, वय ४३ वर्षे यास दनांक ०२/०८/२०२२ रोजी अटक करण्यात आली होती.

त्यानंतर, दिनांक ०३/०८/२०२२ रोजी तपासादरम्यान आरोपी हे पी.पी.सिंग याचेकडुन अंमली पदार्थ एम.डी. खरेदी करीत असल्याचे सांगून त्याने दिलेल्या माहितीवरून सापळा रचुन आरोपी प्रेमप्रकाश पारसनाथ सिंग, वय ५२ वर्षे यास अटक करण्यात आली. त्याचेकडे कौशल्याने तपास करुन त्याने साठा करुन ठेवलेल्या नालासोपारा येथील गोडावुन मधुन ७०१ किलो ७४० ग्रॅम 'एम.डी.' (मेफेड्रॉन) हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला.

पुढील तपासात दिनांक ०४/०८/२०२२ रोजी गुन्हयातील आरोपी प्रेमप्रकाश पारसनाथ सिंग, याने केलेल्या निवेदनाप्रमाणे पोलीस पथक, पंच, रासायनिक विश्लेषण तज्ञांचे पथक व आरोपी यांचेसह त्याने दाखविल्याप्रमाणे अंमली पदार्थाचे उत्पादन केलेले ठिकाण ''नमाऊ केम प्रा. लि., प्लॉट नं. एन २६,एन २७, अंबरनाथ बदलापुर रोड, अॅडीशनल एम.आय.डी.सी., अंबरनाथ, जि. ठाणे येथून ४५२ ग्रॅम 'एम.डी.' (मेफेड्रॉन) हया अंमली पदार्थ (सध्याच्या बाजारभावानुसार किंमत रूपये ९०,४०,०००/—) तसेच सदर अंमली पदार्थ एम.डी. (मेफेड्रॉन) तयार करण्याकरीता ०१ ते ०४ स्टेजमधील पारदर्शक प्लॅस्टीक पिशव्यांमध्ये ठेवण्यात आलेले एकुण ०८ नमुने त्याचे एकुण वजन ९७४.१ ग्रॅम व कच्चा माल असलेले रासायनिक पदार्थ जप्त करण्यात आला.

सदर फॅक्टरीचा मॅनेजर किरण रामकृष्ण चौधरी, वय ५२ वर्षे, याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास नमुद गुन्हयात दिनांक ०५/०८/२०२२ रोजी अटक करण्यात आली. त्याचे निवदेनाप्रमाणे अंमली पदार्थ एम.डी. तयार करण्याची प्रक्रिया दाखविली आहे. सदरबाबत सविस्तर निवेदन पंचनामा करण्यात आला. तसेच आरोपींचे मोबाईल फोन मधील व्हॉटस अॅप चॅट चे अवलोकन केले असता त्यामध्ये केमिकलची नांवे, फोटो, व्हिडीओ, केमिकल प्रक्रिया याबाबत चे चॅट असल्याचे दिसत असल्याने इन्फीनिटी रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट, प्लॉट नं. २९२४, ३ आणि १११ फेज, जी.आय.डी.सी., पानोली, अंकलेश्वर, राज्य— गुजरात या फॅक्टरीचे पार्टनर डॉ. दिक्षीत, मोबाईल क्रमांक ९३७६८७२००० व इन्फीनिटी रिसर्च चे कर्मचारी या दोघांच्या चॅट चे अवलोकन केले असता आरोपी प्रेमप्रकाश पारसनाथ सिंग याने सदर इन्फीनिटी रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट या फॅक्टरीमध्ये एम.डी. ड्रग्स तयार केले असल्याचे स्पष्ट झाले.

नमुद ठिकाणी वरिष्ठांची परवानगी घेवुन पोलीस पथक जावुन दिनांक १३/०८/२०२२रोजी स्थानिक पोलीसांची मदत घेवुन इन्फीनिटी रिसर्च अॅण्ड डेव्हलपमेंट या फॅक्टरीची झडती घेतली असता सदर ठिकाणी ५२१ किलो १२० ग्रॅम एवढा 'एम.डी.' हा अंमली पदार्थाचा साठा तसेच एम.डी. हा अंमली पदार्थ तयार करण्याच्या प्रक्रियेमधील ८१२ किलो ५०० ग्रॅम वजनाची सफेद रंगाची पावडर व ३९७ किलो ६३० ग्रॅम वजनाचे तपकीरी रंगाचे खडे इत्यादी मुद्देमाल पंचासमक्ष जप्त करण्यात आला. तसेच रामेंद्रकुमार गिरीराज दिक्षीत, वय ५० वर्ष यास अटक करण्यात आली.

नमुद गुन्हयाच्या तपासादरम्यान नमाऊ केम प्रा.लि. चे मालक जिनेंद्र वोरा यांना सी. आर.पी.सी. कलम ९१ अन्वये नोटीस देवुन फॅक्टरीबाबत व इतर माहिती मागविण्यात आली होती. सदर माहितीच्या अनुषंगाने ते चौकशीकरीता वरळी युनिट कार्यालयात दिनांक ०९/०९/२०२२ रोजी हजर राहीले. त्यांचेकडे केलेल्या चौकशीत तसेच अद्यापपर्यंत केलेल्या तपासावरून आरोपी प्रेमप्रकाश सिंग याचे सांगणेवरून त्याने त्याच्या नमाऊ केम प्रा.लि. या फॅक्टरीमध्ये एम.डी. ड्रग्ज तयार केल्याचे स्पष्ट झाल्याने तसेच त्याचा गुन्हयातील सहभाग निष्पन्न झाल्याने जिनेंद्र रविचंद व्होरा, वय ५४ वर्षे यास दिनांक ०९/०९/२०२२ रोजी अटक करण्यात आली

त्यानंतर गुन्हयातील अटक आरोपीतांविरुध्द योग्य तो पुरावा त्या त्या संबधीत विभागाकडुन प्राप्त करुन विहीत मुदतीत गुन्हयाचे दोषारोपपत्र स्पेशल केस क्र.१२२९/२२ अन्वये विशेष सत्र न्यायालय, कोर्ट नं ४४, मुंबई येथे दाखल करण्यात आलेले आहे.

नमुद गुन्हयात अद्याप पर्यंत केलेल्या एकुण कारवाईत रूपये ४८५६ कोटी ४१ लाख ४ हजार किंमतीचा व एकुण २४२८ किलो ९५८ ग्रॅम वजनाचा ''एम.डी. (मेफेड्रॉन)'' हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेला आहे.मुंबई याठिकाणी केलेल्या रासायनिक विश्लेषणावरुन सदरचा जप्त अमंली पदार्थ हा ''एम.डी. (मेफेड्रॉन)'' असल्याचे निष्पन्न झाले असुन तसा न्याय सहायक वैज्ञानिक प्रयोगशाळा, मुंबई यांचेकडुन अहवाल प्राप्त झालेला आहे. अशाप्रकारे, गुन्हयाच्या साखळीतील महत्वाचे असलेले अंमली पदार्थाचे मुख्य पुरवठादार, उत्पादक यांना अटक करून फार मोठया प्रमाणात अमली पदार्थ हस्तगत करणे व अंमली पदार्थांचा व्यवसाय करणारी साखळी उध्वस्त करणे शक्य झाले असुन त्यायोगे **'नशामुक्त भारत'** चे उध्दीष्ट साध्य करण्याच्या दृष्टीने अत्यंत मोलाची कामगिरी ठरली आहे.

अंमली पदार्थ विरोधी कक्ष, वरळी युनिट तपासी पथकातील पोलीस अधिकारी व अंमलदार

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | प्रभारी पोलीस निरीक्षक, | संदिप भास्कर काळे, | प्रशस्तीपत्रक |
| २ | पोलीस निरीक्षक, | राजेंद्र एकनाथराव दहिफळे, | प्रशस्तीपत्रक |
| ३ | सहा.पोलीस निरीक्षक, | संतोष शिवराम साळुंखे, | प्रशस्तीपत्रक |
| ४ | सहा.पोलीस निरीक्षक, | अमोल कृष्णात कदम, | प्रशस्तीपत्रक |
| ५ | पोलीस उप निरीक्षक, | रविंद्र आत्माराम सावंत, | प्रशस्तीपत्रक |
| ६ | पोलीस उप निरीक्षक, | शैलेश कमलाकद देसाई, | प्रशस्तीपत्रक |
| ७ | स.पो.उ.नि.क्र.२८९९२ | सुरेश बाळकृष्ण साळुंखे, | प्रशस्तीपत्रक |
| ८ | पो.ह.क्र.९७०६४९ | सुधीर सहदेव साळुंके | प्रशस्तीपत्रक |
| ९ | पो.ना.क्र. ०३६५४ | राजु नामदार तडवी, | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र. ०३९१७ | हरिष रामधन राठोड, | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ना.क्र. ०३१२४६ | राजदिप प्रकाश दळवी, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | पो.ना.क्र. ०३१४१० | प्रितम पुरूषोत्म ढोरे, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पो.ना.क्र. ०४०७३३ | नितीन वसंत जाधव, | प्रशस्तीपत्रक |
| १४ | पो.ना.क्र. ०६१३८५ | हणमंत विठ्ठल येडगे, | प्रशस्तीपत्रक |
| १५ | म.पो.शि.क्र. ०७१२४६ | अनुराध सुधीर टेकाळे, | प्रशस्तीपत्रक |
| १६ | पो.शि.क्र. ०८१६३२ | महेश काका गायकवाड, | प्रशस्तीपत्रक |
| १७ | पो.शि.क्र. ०९०४८० | आकाश धोंडीराम शेलार, | प्रशस्तीपत्रक |
| १८ | स.पो.उ.नि.चा.क्र.२८५७० | राजेंद्र सखाराम कदम, | प्रशस्तीपत्रक |
| १९ | पो.ह.चा.क्र. ३३८४० | हनुमंत मारूती जाधव, | |

मजकुर :—

दिनांक २१/११/२०२२ रोजी मा. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई यांच्या '' **BEST CONVICTION OF THE MONTH "** माहे सप्टेंबर—२०२२ या याकरीता खालील नमुद पोलीस ठाणेंची निवड करण्यात आलेली आहे.

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर — २०२२

| | | |
|---|---|---|
| ०१ | खंडणी विरोधी पथक, गु.प्र.शा., गु.अ.वि., मुंबई | गु.प्र.शा.गु.र.क्र.९९/१५(आर सी एफ पोलीस ठाणे गु.र.क्र. २६१/१५ ) कलम ३८७, ३४, ११५ सह ३०२, १२०(ब) भा.द.वि.सह, ३,२५ ह.का सह ३(१)(ii), ३(२), ३(४) एम.सी.ओ.सी ॲक्ट |

—: '' हत्याराचा धाक व जिवे ठार मारण्याची धमकी देऊन खंडणी '':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात फिर्यादी श्री. विशाल बलदेवराज शर्मा, वय ४२ वर्षे, यांस गॅगस्टर सुरेश पुजारी व प्रसाद पुजारी यांनी परदेशातून अटक एकुण ०८ आरोपींना कटात सहभागी करुन फिर्यादी यांच्या वापरते मोबाईलवर आंतरराष्ट्रीय व भारतातील क्रमांकावरून फोन व एस.एम.एस करून रूपये १० करोड इतक्या रक्कमेची खंडणी मागितली फिर्यादी हे खंडणी देण्यास टाळाटाळ करीत असल्याने पाहिजे आरोपी सुरेश पुजारी याने फिर्यादीना क्षती पोहचविण्यासाठी कट रचला म्हणुन गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री. विशाल बलदेवराज शर्मा, वय ४२ वर्षे, |
| मागणी केलेली रककम | :— | रूपये १०,००००००० /— (रू.१० करोड ) |
| निकाल दिनांक | :— | दि.१६/०९/२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) प्रकाश रामसिंग बिछल उर्फ पक्या,वय ४२ वर्षे,<br>२) मुबश्शीर मुजीब सय्यद, वय ३९ वर्षे,<br>३) गौतम उर्फ डॅनी विनोद मेहता, वय ३३ वर्षे,<br>४) छोटेलाल लुटरीराम जयस्वाल, वय ४३ वर्षे,<br>५) कृष्णा लक्ष्मण खंडागळे, वय ३९ वर्षे,<br>६) संतोष रामचंद्र गायकवाड, वय ३८ वर्षे,<br>७) नरेश जयाराम शेट्टी, वय ४५ वर्षे,<br>८) रवि काळुराम गायकवाड, वय ३८ वर्षे<br>९) शरद चंद्रप्रकाश अग्रवाल, वय ३३ वर्षे,<br>आरोपी क्र.०१— दि.१६/१०/२०१५ रोजी,<br>आरोपी क्र.०२ दि. १६/१०/२०१५ रोजी,<br>आरोपी क्र.०३ ते ०९ दिनांक ०५/१२/२०१५ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | नमूद गुन्हयातील आरोपीतांना मोक्का कलमाअंतर्गत १० वर्षे कठोर कारावासाची शिक्षा व ५,००,०००/— पाच लाख रुपये दंड अशी शिक्षा देण्यात आली आहे. |

**तपास कौशल्य** :— नमुद गुन्हयात अटक आरोपी व साक्षिदाराच्या मोबाईलच्या सी.डी.आरचे विश्लेषण करण्यात आले. फिर्यादी व आरोपी यांच्या आवाजाचे नमुने घेण्यात आले होते. ते विश्लेषणाकरिता पाठविण्यात आले होते. त्याचा अहवाल प्राप्त करण्यात आला. अटक व पाहिजे आरोपी विरुध्द मोक्का अंतर्गत कारवाई करण्यात आली.

आरोपीं विरुद्ध मोक्का शास्त्रोक्त पद्धतीने तपास करुन संघटीत गुन्हेगारी सिध्द करुन मा. न्यायालयात विहीत वेळेत मोक्का अन्वये दोषारोपपत्र सादर करण्यात आले. साक्षिदार, पंच यांना योग्य ते मार्गदर्शन करुन त्यांना मा.न्यायालयात हजर ठेवून नमूद गुन्हयात मा.न्यायालयात मोक्का अंतर्गत गुन्हा सिद्ध होईल, असा पुरावा सादर करण्यात आला.

नमुद सादरीकरणमुळे आरोपींना मोक्का अंतर्गत जास्तीत जास्त शिक्षा मिळविण्यात आली. गुन्हा नोंद झाल्यानतंर आरोपीतास अटक करण्यात आली आहे. आरोपीतास दोषसिध्दी व शिक्षा मिळावी याकरिता तपासी अधिकारी व पथकाने गुन्हयाचे गांभीर्य ओळखून वस्तूजन्य पुरावे हस्तगत केले. तसेच जास्तीत जास्त साक्षीदार जबाब नोंद करण्यात आले, आवश्यक ते सर्व पुरावे मिळवून विहीत वेळेत आरोपीतांविरूध्द दोषारोप पत्र मा. न्यायालयात सादर करण्यात आले.

**, खंडणी विरोधी पथक, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे**

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | तपासी अधिकारी स.पो.आ. | नंदकुमार मोरे (सेवानिवृत्त) | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | वरिष्ठ पोलीस निरिक्षक. | ज्ञानेश्वर रामनाथ गणोरे | |
| ०३ | पोलीस निरिक्षक | संजय हरिभाऊ तरळगट्टी | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरिक्षक | राजु संपत सुर्वे/मानखुर्द पो.ठा. | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | हरिश्चंद्र रामचंद्र जगदाळे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पो.ह.क्र. ९६०३१४ | सुजित अशोक तावडे | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पो.ह.क्र.९८०४६८ | भरत पापा वाझे/वि.शा.१ | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पो.ह.क्र.९७११४५ | सचिन निंबा पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पो.ह.क्र.१२९३६ | प्रितम मोहन पांचाळ | प्रशस्तीपत्रक |
| १० | पो.ना.क्र.०३३९५ | निलेश सुदाम कंद | प्रशस्तीपत्रक |
| ११ | पो.ना.क्र.०६११११ | साधना गोपाळ थोरात | प्रशस्तीपत्रक |

## (ब) बेस्ट कनव्हिक्शन ऑफ दि मंथ सप्टेंबर — २०२२

| | | |
|---|---|---|
| ०३ | पवई पोलीस ठाणे,<br>परिमंडळ—१०, मुंबई | गु.र.क्र. १८२/२०१७ कलम ३०२, ३९७, ३९८, २०१, ४२७, १२०(ब), ३४ भादवि |

—: '' जुना राग मनात धरुन धारदार शस्त्राने जखमी करून खुन'':—

**गुन्हयाची थोडक्यात हकिकत** :— नमुद गुन्हयात नमुद गुन्हयातील आरोपीतानी दिनांक १७/०४/१७ रोजी २२.३० वाजण्याच्या सुमारास यातील जखमी इसम शोएबसना उल्ला खान, याने मासेमारी करण्यास विरोध केला म्हणुन त्याचा मनात राग धरुन आरोपीतानी संगणमत करुन कट रचला. तसेच गैरकायदयाची मंडळी जमुन शोएबसना उल्ला खान, याच्या शरीरावर विविध ठिकाणी वार करुन जीवे ठार मारण्याच्या उद्देशाने पवई तलावात फेकुन दिले. तसेच फिर्यादी व साक्षिदार यांना जिवे ठार मारण्याची धमकी देवुन त्यांचे मोबाइल जबरदस्तीने घेवुन पाण्यात बुडवुन नुकसान केले म्हणून गुन्हा नोंद.

| | | |
|---|---|---|
| फिर्यादी | :— | श्री गुलाब पीरसाहेब शेख, |
| बळीत | :— | शोएबसना उल्ला खान, |
| निकाल दिनांक | :— | दि. २२/०९/२०२२ रोजी |
| अटक आरोपी व अटक दिनांक | :— | १) तरबेज बुदरवेश खान,<br>२) सलीम अक्तर हूसेन सिध्दीकी,<br>दिनांक १७/०४/२०१७ रोजी |
| दोषसिध्दीचा तपशील | :— | सदर गुन्हयात मा. सत्र न्यायालयाने आरोपीतांना गुन्हयात दोषी ठरवुन ठेपेची शिक्षा तसेच प्रत्येक कलमान्वये रुपये १०००/—इतका द्रव्य शिक्षा सुनावली आहे. |

**तपास कौशल्य** :— सदर गुन्हयाच्या अनुषंगाने तपासी अधिकारी यांनी योग्य प्रकारे तपास करुन गुन्हयाच्या तपासात त्रुटी ठेवल्या नाहीत. तसेच यातील मार्गदर्शक अधिकारी यांनी नमुद गुन्हयाच्या सुनावणी च्या वेळी योग्य मार्गदर्शन केले. व न्यायालयीन कोट कामकाज पाहणारे अधिकारी व अंमलदार यांनी फिर्यादी व साक्षिदार यांना योग्य मार्गदर्शन करुन साक्ष देण्याकरीता सहाय्य केले. व समन्स वॉरन्ट अंमलदार यांनी यातील साक्षिदार व पंच तसेच वैघकिय अधिकारी यांना वेळेत मा. न्यायालयात हजर ठेवले.

पवई पोलीस ठाणे, तपास पथकातील अधिकारी व अंमलदारांचे नावे

| अ.क्र. | पदनाम | पोलीस अधिकारी/ कर्मचा—याचे नाव | बक्षिसाचा तपशिल |
|---|---|---|---|
| ०१ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | बाळासाहेब श्रीहरी घावटे,(आर.पी.एफ.पो.ठाणे ), | प्रशस्तीपत्रक |
| ०२ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | बळवंत व्यंकट देशमुख, (साकीनाका पो.ठाणे ) | प्रशस्तीपत्रक |
| ०३ | वरिष्ठ पोलीस निरीक्षक | बुधन पांडुरंग सावंत,(पवई पोलीस ठाणे), | प्रशस्तीपत्रक |
| ०४ | पोलीस निरीक्षक | गणेश सुधाकर पाटील | प्रशस्तीपत्रक |
| ०५ | पोलीस उप निरीक्षक | दिपक जयकर धुमाळे | प्रशस्तीपत्रक |
| ०६ | पोलीस उप निरीक्षक | कृष्णा सोनु धुरी | प्रशस्तीपत्रक |
| ०७ | पोहक्रं.३०९९१ | लक्ष्मण दत्ताराय अडांगळे | प्रशस्तीपत्रक |
| ०८ | पोहक्र. ३३०६२ | ज्ञानदेव अनंदा वगरे | प्रशस्तीपत्रक |
| ०९ | पोहक्रं ९६१०१२ | धंनजय सोपान पाटील (सहार पोलीस ठाणे) | प्रशस्तीपत्रक |
| १० | पोशिक्रं. ०९०८३० | शिवराज दत्ता कोळी,(साकीनाका पो.ठाणे), | प्रशस्तीपत्रक |
| ११ | मपोशि ०८१२४७ | मनिषा हरीभाऊ थोरात, | प्रशस्तीपत्रक |
| १२ | मपोशि ०९११३० | अर्चना यशवंत पानसरे, | प्रशस्तीपत्रक |
| १३ | पोशि ११०९४२ | निवृत्ती रामकृष्ण पवार | प्रशस्तीपत्रक |